45

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2020

SPECIAL ISSUE-CCXXV (225)

## Domestic Violence: Impact on Indian Society




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr Nitin A. Mathankar
Principal
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

**Guest Editor:**
Prof. Deoman Umbarkar
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

**B.Aadhar'** *International Multidisciplinary Research Journal*
**Impact Factor - ( (SJIF) -7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**March 2020**

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | आर्थिक परावलंबित्व आणि कौटुंबिक हिंसाचार | डॉ. वर्षा गंगणे | 1 |
| 2 | कौटूंबिक हिंसाचार व प्रतीबंधक कायदे | सिध्दार्थ बी. टेंभूर्णे | 6 |
| 3 | कौटूंबिक अत्याचार आणि महिलांच्या संरक्षणात्मक कायदे | डॉ. विद्या भैसारे | 11 |
| 4 | मानवाधिकार आणि घरगुती हिंसा | प्रा. अनिल रा. गावंडे | 15 |
| 5 | कौटुंबिक हिंसाचार आणि महिला सुरक्षा विषयक कायदे | प्रा. डॉ. अर्चना भी. खंडागळे | 19 |
| 6 | मानवाधिकार आणि कौटुंबिक हिंसा | डॉ. अभिजित वेरूळकर | 24 |
| 7 | पितृसत्ताक पद्धती व कौटुबिक हिंसे संदर्भात जोतीबा फुले यांचे कार्य व विचार | प्रा. डॉ. सुनिल चवळे | 29 |
| 8 | नेपाली संस्कृति के एक आराध्य देव : नाट्येश्वर | डॉ. प्राची हलगांवकर | 32 |
| 9 | मानक कार्यप्रणाली (NAAC) | डॉ. पुरूषोत्तम गुणवंतराव पखाले | 35 |
| 10 | कौटुंबिक हिंसाचार : स्वरूप, परिणाम आणि उपाय | डॉ. अतुल म. महाजन | 39 |
| 11 | १५ व्या लोकसभेत महाराष्ट्रातील खासदारांचा तारांकीत व अतारांकीत प्रश्ना बाबतचा सहभाग | प्रा. अतुल नारायण खोटे | 43 |
| 12 | पुरुषप्रधान समाजव्यवस्था व कौटुंबिक हिंसाचार | प्रा. डॉ. होमराज टी. राठोड | 48 |
| 13 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ओबीसी करिता केलेले कार्य | प्रा.सतिश कुमार घनश्याम धवड, | 52 |
| 14 | स्त्री आणि कौटुंबिक हिंसाचार कायदा | प्रा.मोनाली बहादूरे | 56 |
| 15 | भारतातिल महिला हिंसाचाराविरुद्ध कायदे | प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार | 60 |
| 16 | भारतीय संस्कृती आणि कौटुंबिक हिंसाचार | प्रा. अनिल एन. चकोले | 65 |
| 17 | कौटुंबिक हिंसाचाराचा भारतीय समाजावर होणारा परिणाम | प्रा. कोटरंगे दत्ता नामदेव | 68 |
| 18 | स्वंतत्र भारतातील संस्कृती व स्त्रीकलह | डॉ. सिद्धार्थ बुटले | 72 |
| 19 | सदयस्थितीतील घरगुती हिंसाचार | प्रा.डॉ. एस.पी. चव्हाण | 75 |

**ISSN : 2278-9308**
**March 2020**


| | | |
|---|---|---|
| 86 | युवक आणि घरगुती हिंसा — प्रा. लालचंद एन. मेश्राम | 373 |
| 87 | कौटुंबिक हिंसाचार व प्रतिबंधात्मक धोरण प्रा. मिश्रीलाल लक्ष्मण अंबादे | 377 |
| 88 | स्त्रीकौटुंबिक हिंसाचार आणि कायदेविषयक तरतूद — प्रा.डॉ. प्रवीणा नागपूरकर | 381 |
| 89 | कौटुंबिक हिंसाचार : एक विश्लेषणात्मक अध्ययन डॉ. महेन्द्र गावंडे | 385 |
| 90 | सामाजिक स्वास्थ में संगीत की भूमिका डॉ. सारिका विवेक श्रावणे, | 389 |
| 91 | घरगुती हिंसाचाराचा ग्रामीण भागातील खेडाळूवंर पडणारा प्रभाव — प्रा.नाजुकराम बनकर | 392 |
| 92 | मानवी हक्क आणि कौटुंबिक हिसांचार कायदा यातील संबंध — डॉ. कैलाश वि. बिसांद्रे | 395 |
| 93 | नोकरदार महिला व कौटुंबिक अत्याचार– एक विश्लेषण — प्रा. डॉ. निलीमा दि. कापसे | 404 |
| 94 | मराठी संस्कृती आणि रंगभुमीवरिल लोककला, प्रकार — प्रा. वंदना म. देशमुख /डॉ. शिरीष व्ही. कडू | 407 |
| 95 | कौटूंबिक आर्थिक हिंसाचार आणि कायदेशिर तरतूद : एक आढावा — प्रा. डॉ. विवेक अ. चौधरी | 410 |
| 96 | कौटुंबिक हिंसाचार : एक समाजशास्त्रीय अध्ययन — प्रा. नंदकिशोर उकंडराव राऊत | 414 |
| 97 | कौटुंबिक हिंसाचार – [illegible] आणि [illegible] — डॉ. एच. यु. पेटकर | 420 |
| 98 | प्लेटो यांचे न्याय व शैक्षणिक विचार डॉ. उज्वला दिगंबर गोंडाणे | 425 |
| 99 | सामाजिक बदलाव एवं संगीत डॉ. नेत्रा श्रीकांत तेल्हारकर | 429 |
| 100 | ऑरिस्टाटलचे कुटुंब संस्थेविषयी व संपत्तीसंबंधीचे विचार — डॉ. साधना मौंदेकर | 433 |
| 101 | पारिवारिक कलह एक दृष्टिपात: हिन्दी साहित्य के अंतर्गत नागार्जुन — नितिन अ. बनकर | 435 |
| 102 | कृषी उत्पादन व्यावसायातील संधी आणि आव्हाने डॉ. विद्या पा. चन्ने | 439 |
| 103 | वाचन कौशल्य विकास — प्रा. सारिका पाटील | 445 |
| 104 | सक्षम समाजनिर्मितीकरीता महिलांचे सबलीकरण प्रा. सुरेश पवार | 449 |
| 105 | कौटुंबिक हिंसाचार, स्त्रिया व राज्यघटना डॉ. चंदु के. पोपटकर | 453 |
| 106 | मानवाधिकार व कौटूंबिक हिंसाचार प्रा.प्रशांत र. घुलक्षे | 457 |
| 107 | घरेलू हिंसा और स्त्री — प्रा. तेलंगे नागनाथ निवृत्ती | 463 |

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

# कौटुंबिक हिंसाचार – काल आणि आज

डॉ. एच. यु. पेटकर
सहयोगी प्राध्यापक कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय चिखलदरा
जि. अमरावती

अगदी प्राचीन काळापासून (पुरुषप्रधान सत्तेपासून) जगातील सर्व देशामध्ये स्त्री ही उपेक्षित असलेली दिसून येते. स्त्रीला उपभोगाची वस्तू / साधन म्हणून तिच्याकडे बघीतले जाते. स्त्रीयांना मानवी मूलभूत अधिकार सुध्दा दुसऱ्या महायुध्दापर्यंत मिळाले नव्हते. दुसऱ्या महायुध्दानंतर मानवी अधिकाराची चळवळ पुढे आली व मानवाच्या अधिकाराची व्याख्या व चौकट तयार व्हायला सुरुवात झाली. (१९७५) यामध्ये जगातील अनेक स्त्रीवादी संघटना विचारवंत स्त्री अधिकाराची मांडणी करु लागले तसेच अनेक देशांमध्ये आंदोलने सुध्दा झालेली दिसून येते. पुढे UNO च्या Universal Declaration मध्ये स्त्रीयांच्या अधिकारावर एकमत होऊ लागले व स्त्रियांवर होत असलेले अत्याचार स्वीकारले जाऊ लागले. फ्रान्स, ब्राझील, जर्मनी इत्यादी देशामध्ये स्त्रियांच्या चळवळीने उग्र रुप धारण केले व स्त्रियांच्या चळवळीला दडपण्याचे प्रयत्नही करण्यात आले. त्या बलिदानाच्या स्मरणार्थ ८ मार्च १९७५ ला आंतरराष्ट्रीय महिला वर्ष व ८ मार्चला जागतिक महिला दिन म्हणून पाळल्या जाऊ लागला.

प्राचीन काळापासून भारतामध्ये कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रामध्ये महिलांना दुय्यम दर्जा मिळालेला आहे. भारतामध्ये आजही महिलांकडे गुलाम, दासी, उपभोगाचे साधन म्हणून बघीतल्या जात. भारतीय संविधानाने महिलांना कायदेशीररित्या मूलभूत अधिकार स्त्री–पुरुषांना समान आहे एवढेच नव्हे तर शिक्षण, आरोग्य, रोजगार, नोकरी व राजकीय क्षेत्रात देखील समान दर्जा व संधी उपलब्ध करुन दिली. स्त्रियांच्या विकासासाठी वेगवेगळया योजना तसेच स्वतंत्र मंत्रालयाची, आयोगाची सुध्दा निर्मिती केली. (महिला व बालविकास मंत्रालय) महिला अधिकार आयोग यासोबतच महिलांसाठी विविध कायदे करण्यात आले. उदा. पुनर्विवाह कायदा, वारसाहक्क दत्तक विधान कायदा, गर्भजल परिक्षण प्रतिबंध कायदा, महिलांची अवैधरित्या विक्री बंदी कायदा, विशाखा नियम, प्रसुतीकाळातील सेवा कायदा, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, हुंडाबळी कायदा इत्यादी ह्याचा उद्देश हाच होता की, महिलांना सुरक्षितता व संरक्षण प्रदान करणे व त्यांचा विकासामध्ये सहभाग वाढविणे आर्थिक व राजकीय धोरणात महिलांना विचारात घेऊन धोरण व योजना तयार करण्यात येत आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने सुध्दा Human Development Index मध्ये आता Women Development Index अंतर्भूत केला व त्याचे स्वतंत्र निकष निर्धारित करुन ते प्राप्त करण्याकरिता सर्व देशांना सुचित केले आहे. तरी देखील महिलांवर होणाऱ्या कौटुंबिक हिंसाचाराला पूर्णपणे आळा बसलेला नाही.

आधुनिक काळामध्ये समाज प्रगतशील झाला आहे असे आपण वारंवार सांगत असलो तरी अनेक कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना रोज वर्तमानपत्रातून व वेगवेगळया टि. व्ही. चॅनल्सवरुन आपल्या समोर येत आहेत. स्त्रियांवरील अन्याय अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहेत. बुध्दिमत्ता, शारीरिक क्षमता, सृजनशीलता, कष्ट करण्याची धमक इत्यादी बाबींमध्ये स्त्रिया पुरुषांपेक्षा कमी लेखण्याची वृत्ती २१ व्या शतकात काय आहे याची जाणीव आपणास आहे. स्वत:ला आधुनिक म्हणवणाऱ्या पुरुषांचा दृष्टिकोन स्त्रियांच्या बाबतीत अजुनही मागासलेलाच असल्याचे प्रमाण अधिकांश आहे. समाजाची स्त्रियांकडे पाहण्याची दुय्यम मानसिकताच तिच्या

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

अनेक समस्यांच्या मुळाशी आहे. स्त्रियांवर होणारे कौटुंबिक अत्याचार म्हणजे सत्ता आणि नियंत्रणाचेच प्रतिक आहे असे आपल्या लक्षात येते.

भारतामध्ये स्त्रियांचे शोषण हे वैदिकाळ, उत्तर वैदिकाळ व मध्यकाळ यापुरतेच मर्यादित राहिलेले नसून आधुनिक काळात सुध्दा महिलांवर कौटुंबिक अत्याचार करण्यात येतात. आजही आधुनिक समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांना शुन्य मानणारी विचारधारा अस्तित्वात आहे.

**हिंसाचाराचा अर्थ :**

हिंसा ही शारीरिक व मानसिक अशा दोन्ही स्वरुपाची असू शकते. शारीरिक हिंसप्रमाणे मानसिक हिंसादेखील स्त्रियांना त्रासदायक ठरते. हिंसाचाराची व्याख्या करणे तसे कठिणच आहे. परंतु काही अभ्यासक शारीरिक मानहानीसारख्या ज्या कृत्यातून दुसऱ्याच्या शरीराला प्रत्यक्ष इजा होते त्या कृत्याला 'हिंसक कृत्य' असे संबोधतात. तर काही अभ्यासक शारीरिक इजा होण्याची संभाव्यता ज्या कृत्यामध्ये सर्वात जास्त असते अशा कृत्याला 'हिंसक कृत्य' असे संबोधतात. हिंसाराचारामध्ये शारीरिक इजेसोबतच मानसिक इजा किंवा मनावरील आघात करणाऱ्या घटना पुरषांकडून होत असेल त्याला देखील 'हिंसक कृत्य' असे संबोधण्यात येते. काही विचारवंतांना असे वाटते की, स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर आघात करणाऱ्या गोष्टी घटना असतील तर त्यांना सुध्दा 'हिंसक कृत्य' असे संबोधण्यात यावे.

वरील अभ्यासकांची मते लक्षात घेतल्यानंतर हिंसाचाराचा आशय स्पष्ट करणारी एक व्यवहारोपयोगी व्याख्या आपणास पुढीलप्रमाणे करता येईल.

''प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष मार्गाचा अवलंब करुन सत्ता, संपत्ती, बळ यासारख्या सामर्थ्याच्या आधारे आपणास हवी असणारी गोष्ट दुसऱ्यांच्या इच्छेविरोधी बळजबरीने हिसकावून घेण्यासाठी केलेले कृत्य म्हणजे हिंसाचार होय.'' यामुळे दुसऱ्या व्यक्तीला शारीरिक इजा होते किंवा मानसिक धक्का बसतो किंवा या दोन्हीही बाबींना सहन करावे लागते.

कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ स्पष्ट करीत असताना वरील घटनांचा कुटुंबामध्ये स्त्रियांनाच धक्का बसलेला असतो. स्त्रिला कुटुंबामध्ये स्वतंत्र विचार करण्याचे, आचार करण्याचे, निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नसते. ती परावलंबी असून मन मारुन कुटुंबामध्ये राहत असते. तिला कुटुंबामध्ये समानतेची वागणूक न देता गृहीत धरल्या जाते. म्हणजेच कुटुंबामध्ये तिला दुय्यम लेखल्या जाते. स्त्रिची कुटुंबामध्ये आर्थिक, मानसिक, शारीरिक पिळवणूक केली जाते.

**अध्ययन पध्दती :**

अध्ययनकर्ता मागील वीस वर्षापासून समाजशास्त्र हा विषय पदवीच्या विद्यार्थ्यांना शिकवतो. अनेक ग्रामीण शिबीर, महिला मेळावे, महिला बचत गट शिबीरे या माध्यमातून महिलांशी आलेला त्यांचा संपर्क व या संपर्कामधूनच अनेक महिलांशी झालेली चर्चा, संवाद या चर्चा व संवादामधूनच कौटुंबिक हिंसाचाराची वास्तविकता मांडणाऱ्या महिला, त्यांचे अनुभव लक्षात घेऊनच संशोधकाने कौटुंबिक हिंसाचार – काल आणि आज या विषयाची निवड केली.

**अध्ययनाचे उद्देश :**

१. महिलांवर होणाऱ्या कौटुंबिक अत्याचाराची कारणे जाणून घेणे.
२. महिलांवर होणाऱ्या कौटुंबिक अत्याचाराविषयी पुरुषांची मानसिकता जाणून घेणे.
३. महिलांवर होणाऱ्या कौटुंबिक अत्याचाराविषयी कुटुंबातील सदस्यांची मानसिकता अभ्यासणे.

**नमुना निवड व अध्ययन क्षेत्र :**

प्रस्तुत अध्ययन हे प्राथमिक व दुय्यम तथ्यावर आधारीत असून मेळघाट जि. अमरावती या क्षेत्रातील प्राथमिक तथ्य व संबंधित साहित्याचे परिक्षण करुन विषयाची मांडणी करण्यात आली. याकरिता असंभाव्यता नमुना निवड पध्दतीतील सोईस्कर नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

आला. तथ्य संकलनाकरिता प्रत्यक्ष मुलाखत पध्दती व निरीक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला. मिळालेल्या माहितीच्या आधारावर विश्लेषण करुन तसेच दुय्यम साहित्याचा आधार घेऊन निष्कर्ष मांडण्यात आले. निघालेल्या निष्कर्षाचा विचार करुन काही सूचना करण्यात आल्या.

स्त्रियांविरोधी कौटुंबिक हिंसाचाराच्या बाबतीत डॉ. राम आहुजा यांनी आपल्या अध्ययनात स्पष्ट केले की, भारतीय समाजात ज्या स्त्रियांची हत्या होते त्या स्त्रिया आपली हत्या करणाऱ्या (पती, सासू, दिर, नणंद) हत्याऱ्यांच्या संपर्कात साधारणत: पाच ते सात वर्ष राहिलेली असते. बऱ्याच स्त्रिया पतीच्या छळाला कंटाळून आत्महत्या करतात. स्त्रियांद्वारा होणाऱ्या आत्महत्या ह्या बऱ्याच वेळा भावनेच्या भरात होतात. घरगुती भांडण, नवऱ्याचे अनैतिक संबंध, अति मद्यप्राशन, कुटुंबातील सदस्यांचा जाच इत्यादी कारणे आत्महत्येच्या पाठीमागे असतात. भारतात होणाऱ्या स्त्रियांच्या हत्यांपैकी बहुतांश हत्या हुंड्याच्या कारणामुळे होतात. भारतीय समाजात स्त्रियांच्या हत्या ही सुध्दा स्त्रियांच्या संदर्भातील एक महत्त्वाची समस्या आहे.

सन्मान हत्यासंदर्भात प्रो. शरीफ खन्नाना म्हणतात की, सन्मान हत्या ही गुंतागुंतीची बाब आहे. अरब समाजाच्या इतिहासात आढळते. पितृसत्ताक समाजव्यवस्थेत पुरुष कुटुंब, कुळ किंवा जमातीमध्ये पुनर्उत्पादनाच्या शक्तीवर नियंत्रण नेहमीच ठेऊ पाहतो. जमातीमध्ये स्त्री म्हणजे माणसे तयार करणारी यंत्रणा अशा अर्थाने बघितले जाते. लैंगिक आचरण किंवा शक्तीवर नियंत्रण मिळविणे हे सन्मान हत्तेचे द्योतक नसून खरे कारण पुनर्उत्पादनाची किंवा सुपिकतेची क्षमता हे होय. भारताच्या संदर्भात सन्मान हत्येला पुढीलपैकी एक कारण जबाबदार असते.

१. स्त्रिने समुदाय किंवा कुटुंबातील असमान्य असलेला पोषाख परिधान करणे.
२. कुटुंबांनी जुळविलेल्या विवाहाला नाकारले किंवा स्वत:च्या मर्जीतील व्यक्तीसोबत विवाह करणे.
३. विवाहबाह्य लैंगिक संबंध किंवा विवाहबाह्य असा संबंध की, जो लैंगिक नसला तरी समुदाय मान्य नसलेला.
४. समलैंगिक संबंध.

काही विचारवंतांनी कौटुंबिक हिंसाचाराला स्त्री—पुरुषांमधील वर्चस्ववादी विचारसरणी करणीभूत असल्याचे नमूद केले त्यांच्या मते पुरुष कुटुंबावर स्वत:चे वर्चस्व कायम ठेवण्याकरिता स्त्रिला सातत्याने दुय्यम स्वरुपाची वागणूक देत असतो. तिच्या कुठल्याही श्रमाचे मूल्य हे शून्य ठरवित असतो. स्त्री कितीही कष्ट करीत असली, कुटुंबाचा पूर्ण भार तिच्यावर असला तरी तिला कुटुंबामध्ये दुय्यम स्वरुपाचे स्थान प्राप्त झाले असते कुटुंबाचा प्रमुख हा पुरुष असल्याने तो सातत्याने तिला अपशब्दाने बोलतो, लहान—सहान गोष्टीसाठी तिचा अपमान करतो. इतरांसमोर तिला रागावणे मारणे, भांडण करणे यामध्ये तो स्वत:चे श्रेष्ठत्व सिध्द करण्याचा प्रयत्न करतो.

संशोधकाने प्राथमिक तथ्य मिळविण्याकरिता ६० महिला व ४० पुरुषांच्या मुलाखती घेतल्या. त्यामध्ये महिलांच्या कौटुंबिक हिंसाचाराकरिता पुरुषसत्ताक कुटुंबव्यवस्था जबाबदार आहे असे ९३ टक्के महिलांनी आपली मते नोंदविली तर फक्त १०टक्के पुरुषांनीच पुरुषसत्ताक कुटुंबपध्दती महिलांच्या कौटुंबिक हिंसाचाराकरिता जबाबदार आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. अपत्य प्राप्तीकरिता महिलांना कुटुंबामध्ये अपमानास्पद वागणूक दिली जाते. तसेच तिचा मानसिक व शारीरिक छळ केला जातो असे ९५ टक्के महिलांनी सांगितले तर ५५ टक्के पुरुषांनी सुध्दा अपत्य प्राप्ती कारणाकरिता कुटुंबामध्ये स्त्रियांचा शारीरिक व मानसिक छळ केला जातो. हुंड्याकरिता स्त्रियांचा कुटुंबामध्ये छळ होतो असे १०० टक्के स्त्रियांनी सांगितले. यामध्ये कधी कधी तर महिलांची हत्या सुध्दा केली जाते किंवा तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले जाते अशीही अनेक महिलांनी प्रतिक्रिया व्यक्त केली तर ८० टक्के पुरुषांनी हुंड्याकरिता महिलांचा मोठ्या

प्रमाणात छळ करण्यात येतो असे सांगितले यामध्ये सुध्दा अनेक पुरुषांनी हुंड्यासाठी स्त्रियांच्या हत्या करण्यात येते अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या. ज्या घरातील पुरुष व्यसन करतात (उदा. दारु, गांजा, अफिम) त्या घरातील स्त्रियांवर अत्याचार होतात असे ९२ टक्के महिलांना सांगितले. यामध्ये त्या घरातील स्त्रियांना मारहाण करण्यात येते. शिव्या देण्यात येतात. ५५ टक्के पुरुषांनी ज्या घरातील पुरुष व्यसन करतात त्या घरातील स्त्रियांवर शारीरिक व मानसिक अत्याचार होतो अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

मुलाला मुलगी पसंत नव्हती परंतु घरच्यांनी जबरदस्तीने मुलाचे लग्न लावून दिले त्यामुळे स्त्रियांवर अत्याचार होतात अशी प्रतिक्रिया ७० टक्के स्त्रियांनी दिली. तिच्यासोबत न बोलणे तिचा अपमान करणे नवरा तिला स्पर्शही करीत नाही अशा प्रकारची मानसिक हिंसा केली जाते. ३५ टक्के पुरुषांनी मुलगी पसंत नव्हती परंतु घरच्यांनी जबरदस्तीने मुलाचे लग्न लावून दिले त्यामुळे स्त्रियांवर हत्याचार होतात अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. घरातील कामे खानपान पाहुण्यांचा मानसन्मान याकरिता स्त्रियांचा छळ करण्यात येतो अशी ७० टक्के महिलांनी प्रतिक्रिया व्यक्त केली तर फक्त १० टक्के पुरुषच वरील घटकावर महिलांचा छळ होतो अशी मते देतात.

महिलांवर होणारे अन्याय अत्याचारावर आधारीत कोणतीही व्यवस्था टिकून राहण्यामध्ये मिथकांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. पिढ्यानपिढ्या ही मिथके संस्कारामधून एक पिढी दुसऱ्या पिढीला हस्तांतरीत करीत असते त्याचा अंतर्मनावर खुप परिणाम होतो त्यामुळे लोक त्यांना नकळत स्वीकारत असतात. स्त्रियांच्या आरोग्याशी निगडीत आणि स्त्रियांच्या दुय्यमत्वाला खतपाणी घालणाऱ्या मिथकाचा विचार केला तरी मिथकांचे महत्व लक्षात येते. उदा. स्त्रियांना बुध्दी कमी असते, घराबाहेरील जबाबदाऱ्या पार पाडू शकत नाही. स्त्रिया शारीरिकदृष्ट्या अबला आहे, स्त्रियांची किंमत मुलाच्या जन्मावर अवलंबून असते, स्त्री ही अपत्य देणारी मशिन आहे, स्त्री ही पुरुषापेक्षा कनिष्ठ आहे यामुळे दीर्घकाळापासून महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराची मालिका सतत सुरु असलेली दिसते. भारतीय समाजव्यवस्थेमध्ये (जातिव्यवस्थेमध्ये) स्त्रियांना शुद्र लेखले आहे. त्यामुळे देखील त्यांच्यावर अन्याय अत्याचार होत असतात. पौराणिक काळापासून स्त्री ही पुरुषाची दासी, गुलाम, पुरुषाची म्हणजे पतीची सेवा करणे हेच पत्नीचे कर्तव्ये आहे किंवा पती कसाही असला तरी तो पत्नीचा 'देव' आहे. यासारख्या भ्रामक समजुतीमुळे स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन एककल्ली आहे. त्यामुळे पतीकडून पत्नीला मारहाण होण्यासारखे प्रकार भारतीय समाजात राजरोसपणे चालू आहे व आजही पुरुषसत्ताक पध्दतीमुळे सर्वत्र पारंपरिक पध्दतीनुसार समाजव्यवस्थेची रचना बघावयास मिळते त्यामुळे आजही महिलांना मारणे, अपमान करणे, हत्या करणे, आत्महत्येस प्रवृत्त करणे अशाप्रकारे गुन्हे घडताना दिसत आहे. पारंपरिक व आधुनिक समाजव्यवस्थेमध्ये कुटुंबांर्तगत हिंसाचारामध्ये प्रामुख्याने सासरा, भासरा, दिर ही पुरुषमंडळी तर सासू, नणंद ही महिला मंडळीही सहभागी असते. परंपरागत चालत आलेली भारतीय संस्कृती देखील स्त्रियांना अन्यायाविरुध्द आवाज उठवू देत नाही. त्या संस्कृतीच्या ओझ्याखाली दडल्या जातात व निमूटपणे अन्याय सहन करीत असतात.

**सारांश व निष्कर्ष :**

प्रस्तुत संशोधनासाठी वापरलेल्या तथ्य संकलनाच्या साधनाद्वारे जी माहिती अथवा तथ्य मिळाले व त्याचे विशेषण करुन जे निष्कर्ष प्राप्त झाले त्याचा थोडक्यात सारांश खालीलप्रमाणे.

१. साधारणत: कुटुंबामध्ये ज्या स्त्रियांची हत्या होते त्यांचा हत्याऱ्यांसोबत पाच ते सात वर्ष संपर्क असतो तसेच आत्महत्या करणाऱ्या स्त्रिया या अनेक कारणांमुळे भावनेच्या भरात आत्महत्या करतात.

**B.Aadhar'** International Multidisciplinary Research Journal
**Impact Factor - ( (SJIF) -7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**March 2020**

२. कौटुंबिक अथवा सामाजिक मूल्यांना नाकारुन स्त्रिया जेव्हा वर्तन करतात तेव्हा कुटुंबाअंतर्गत त्यांची हत्या केली जाते याला सन्मान हत्या असे म्हणतात.

३. कुटुंबामध्ये स्त्रियांवर होणाऱ्या हिंसाचाराला पुरुषांमधील वर्चस्ववादी विचारसरणी कारणीभूत आहे.

४. महिलावर होणाऱ्या कौटुंबिक हिंसाचाराला पुरुषसत्ताक व्यवस्था जबाबदार आहे असे ९३ टक्के महिलांना वाटते व फक्त १० टक्के पुरुषांना वाटते.

५. अपत्याकरिता कुटुंबामध्ये महिलांवर अत्याचार होतो असे ९५ टक्के महिलांना तर ५५ टक्के पुरुषांना वाटते (मुलगाच पाहिजे)

६. हुंड्याकरिता कुटुंबामध्ये महिलांच्या शारीरिक व मानसिक छळ केला जातो असे १०० टक्के महिलांना तर ८० टक्के पुरुषांना वाटते. यावरुन पारंपरिक व आधुनिक समाजव्यवस्थेमध्ये हुंडाबळीचे स्वरुप व तिव्रता लक्षात येते. व्यसनाधिनतेमुळे कौटुंबिक हिंसाचार होतो असे ९२ टक्के महिलांना तर ५५ टक्के पुरुषांना वाटते.

७. घरातील कामे, खानपान, पाहूण्यांचा मानसन्मान याकरिता महिलांचा छळ करण्यात येतो असे ७० टक्के महिलांना वाटते तर फक्त १० टक्के पुरुषांना वाटते.

८. संस्कृती, परंपरा व मिथकांचा समाजावर प्रभाव असल्याने पारंपरिक व आधुनिक समाजामध्ये महिलांवर अत्याचार करण्यात येतो.

९. कुटुंबाअंतर्गत हिंसाचारामध्ये फक्त एकट्या पतिचाच सहभाग नसतो तर त्यामध्ये प्रामुख्याने पतीचे, आई, वडील, बहिण, भाऊ यांचाही सहभाग असतो.

सूचना :

१. कुटुंबामध्ये मुलगा व मुलगी असा भेद करु नये व पारंपरिक कार्याची विभागणी लिंगाच्या आधारावर करु नये. दोघांनाही कुटुंबातील सर्व कामामध्ये सहभागी करावे.

२. स्त्री–पुरुष समानतेचे धडे लहानपणापासूनच मुलांना कुटुंबातून दिल्या गेले पाहिजे.

३. कुटुंबातील सर्व सदस्यांनी कुटुंबाची जबाबदारी ही सर्वांची आहे ही भावना कुटुंबातील सदस्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे.

४. स्त्री पुरुष समानता व सामाजिक मूल्य यावर आधारीत अभ्यासक्रम तयार करुन शाळा महाविद्यालयामधून तो शिकविला गेला पाहिजे.

५. शासनाने प्रत्येक वाड्या, वस्त्यांमध्ये तसेच शहरांमध्ये देखील स्त्री–पुरुष समानता अभियान राबवावयास पाहिजे.

६. शासनाने व्यसन व हुंडा किती वाईट आहे यावर मोठ्या प्रमाणात जनजागृती करावयास पाहिजे. व्यसन करणाऱ्याला व हुंडा घेणाऱ्याला कठोर शिक्षा मिळायला पाहिजे.

संदर्भ सूची :

गुप्ते, मनिषा आणि मोरे अर्चना (२००७). *चक्रभेद.* पुणे महिला सर्वांगिण उत्कर्ष मंडळ (मासूम).

पाटील, लिला (१९९८). *ओलांडतांना.* पुणे : श्री विद्या प्रकाशन.

पांगुळ–बाराहाते, नंदा (२०१४). *महिलांवरील लैंगिक अत्याचार.* नागपूर : आर. बी. प्रकाशन.

साळुंखे, आ. ह. (१९८९). *हिंदूसंस्कृती आणि स्त्री.* मुंबई : लोकवाङ्मय गृह.

राऊत, एन. यू. (२०१३). *महिला सुरक्षा एवं समाज.* जयपूर : सत्यम पब्लिशर्स एन्ड डिस्ट्रीब्युटर्स.

श्रीवास्तव, सुधाराणी आणि श्रीवास्तव, आशा (२००४). *महिला शोषण और मानवाधिकार.* नई दिल्ली : अर्जुन पब्लिशिंग हाऊस. भाटी, कांता (२००४). *महिला उत्पीडन तथा दहेज हत्या.* जयपूर : पॉईन्टर पब्लिशर्स.

Dr. Anand V. Dudul
Associate Professor & Head, Department of Marathi,
Arts, Science & Commerce College, Chikhaldara.